N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** अजनगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0243 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/04/2025 21:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 28/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/04/2025
**Time From (वेळेपासून):** 14:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/04/2025 **Time (वेळ):** 20:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 046
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/04/2025 20:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,अंजनगांव सुर्जी जिअमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री सुभाष भाऊराव गिते
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भंडारज,अंजनगांव सुर्जी,अजनगांव,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भंडारज,अंजनगांव सुर्जी,अजनगांव,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9763643981

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री राजेश राजदेव यादव | | | 1. भंडारज,अंजनगांव सुर्जी, अजनगांव,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री गणेश नारायण कुकडे | | | 1. आठवडी बाजार,अंजनगांव सुर्जी ,अजनगांव,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रु दराच्या 16 नोटा | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत अशा प्रकारे आहे, फिर्याद वरुन दिनांकः- 28.04.2025 नावः- श्री. सुभाष भाऊराव गिते, वय 70 वर्ष, व्यवसाय- शेती, रा. भंडारज ता. अंजनगांव जि. अमरावती मी आज दिनांक 28.04.2025 रोजी पोलीस स्टेशन अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वर नमुद पत्यावर राहत असुन शेतीचे कामे करतो. मी मुख्य प्रवर्तक म्हणुन 'नियोजित मथुराबाई गृहतारण सहकारी संस्था मर्या. भंडारज ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती' या नावाने संस्था नोंदणी करण्याकरीता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी येथे आवष्यक सर्व कागदपत्रांसह दिनांक 09.12.2024 रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर संस्था नोंदणीच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी यांचे कार्यालयीन पत्र क्र. 185/2025 दिनांक 29.01.2025 अन्वये सदर प्रस्तावातील त्रुटी पुर्ततेकरीता मला प्राप्त झाले. त्याअनुषंगाने दिनांक 07.04.2025 रोजी सदर पत्रामधील नमुद त्रुट्यांची पुर्तता करून सुधारीत प्रस्ताव कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी येथे सादर केलेला आहे. त्यावेळी श्री. राजेष यादव, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी यांनी मला म्हटले की, ''तुमचे सदर संस्थेचे खाते जिल्हा को-ऑप. बँक शाखा सुर्जी येथे जावून खाते उघडण्याची प्रक्रिया पुर्ण करून घ्या, त्यानंतर तुमची संस्था नोंदणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र मी तुम्हाला देतो, त्याकरीता तुम्ही मला 7000/- द्या'' त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव माझेकडे असलेले 2000/- रूपये दिले व उर्वरीत रू. 5000/- नंतर आणुन देतो असे म्हटले. परंतु मला श्री. राजेष यादव यांनी मागणी केलेली उर्वरीत लाच रक्कम द्यायची नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथे दिनांक 22.04.2025 रोजी तक्रार दाखल केली. मी दिलेल्या तक्रारीवरून श्री. मिलींदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांनी दोन शासकिय पंचांसमक्ष माझे तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 25.04.2025 रोजी चे 13.35 ते 14.42 वा. दरम्यान कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे लाच मागणी पडताळणी केली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार क्र.1) श्री. राजेष यादव, सहाय्यक निबंधक यांनी 'नियोजित मथुराबाई गृहतारण सहकारी संस्था मर्या. भंडारज ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती' या नावाने संस्था नोंदणी करून नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरीता माझेकडे स्वतःकरीता रू. 5000/- व गैरअर्जदार क्र. 2) श्री. कुकडे, लिपीक यांचेकरीता रू. 2000/- लाच रकमेची मागणी केली. तसेच श्री. कुकडे, लिपीक यांनी माझेकडे स्वतःकरीता रू. 3000/- लाच रकमेची मागणी केली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार यांनी संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र सोमवारी देणार असल्याचे सांगीतल्याने गैरअर्जदार यांचे विरूध्दची पुढील कार्यवाही सोमवार दिनांक 28.04.2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आज दिनांक 28.04.2025 चे 14.07 ते 14.30 वा. दरम्यान गैरअर्जदार क्र.1) श्री. राजेष यादव, सहाय्यक निबंधक व गैरअर्जदार क्र. 2) श्री. गणेष कुकडे, मुख्य लिपीक यांचे विरूध्द कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे दोन्ही पंचासमक्ष सापळा कार्यवाही करण्यात आली. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार क्र. 1) श्री. राजेष राजदेव यादव, वय 55 वर्ष, पद- सहाय्यक निबंधक, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती यांनी माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 5000/- त्यांचे कार्यालयीन कक्षात स्विकारली. तसेच गैरअर्जदार क्र. 2) श्री. गणेष नारायणराव कुकडे, वय 36 वर्ष, पद- मुख्य लिपीक, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती यांनी मागणी केलेली लाच रक्कम रू. 3000/- माझेकडुन कार्यालयातील स्टोअर

रूमध्ये स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास गैरअर्जदार क्र. 1) श्री. राजेष राजदेव यादव व गैरअर्जदार क्र. 2) श्री. गणेष नारायणराव कुकडे यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केल्याने अॅन्टी करप्षन ब्युरोच्या पथकाने गैरअर्जदार क्र. 1) श्री. राजेष राजदेव यादव व गैरअर्जदार क्र. 2) श्री. गणेष नारायणराव कुकडे यांना पंचासमक्ष लाच रकमेसह ताब्यात घेतले. तरी दिनांक 28.04.2025 चे 14.07 ते 14.30 वा. दरम्यान कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथे गैरअर्जदार क्र.1) श्री. राजेष राजदेव यादव यांनी 'नियोजित मथुराबाई गृहतारण सहकारी संस्था मर्या. भंडारज ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती' या नावाने संस्था नोंदणी करून नोंदणी प्रमाणपत्र देण्याकरीता माझेकडुन लाच रक्कम रू. 5000/- व गैरअर्जदार क्र. 2) श्री. गणेष नारायणराव कुकडे यांनी रू. 3000/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचेविरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझी फिर्याद मी सांगीतल्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली असुन मी वाचून पाहिली. सदर फिर्याद माझे सांगणेप्रमाणे बरोबर नोंदविली आहे, फिर्यादी च्या लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRASHANT SURESH DAGALE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PRASHANT SURESH
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**